अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :- २९/१०/२०२४

## प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ३२/२०२४ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | श्री संगमेश्वर गोपाळराव एकाळे, ३१ वर्ष, नोकरी - पोलीस उप निरीक्षक, वनराई पोलीस ठाणे, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | प्रथम ५,०००/- रूपये व तडजोडी अंती रूपये २,५००/- |
| पडताळणी दिनांक | दिनांक १९/०७/२०२४ रोजी |
| लाच स्विकारलेली रक्कम | नाही |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे अशील यांची फसवणूक केल्याबाबत त्यांनी वनराई पोलीस ठाणे येथे तक्रारअर्ज दिलेला होता. सदरहू तक्रारअर्ज पोलीस उप निरीक्षक संगमेश्वर एकाळे यांचेकडे प्रलंबीत होता. तक्रारदार यांनी नमूद तक्रारअर्जावर कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्याकरीता लोकसेवक यांची भेट घेतली असता, लोकसेवक यांनी गुन्हा दाखल करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे रू. ५,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १९/०७/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहुन लोकसेवकाविरूध्द तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीवरून दिनांक १९/०७/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे गुन्हा दाखल करण्याकरीता तडजोडीअंती रूपये २,५००/- इतक्या लाचेच्या रक्कमेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले व त्या रक्कमेचा गैरलाभ मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणुन संगमेश्वर गोपाळराव एकाळे, पोलीस उप निरीक्षक, वनराई पोलीस ठाणे, मुंबई यांच्याविरूध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. प्रमोद सुर्वे, पो.नि.
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सत्यमेव जयते बृहन्मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.
संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

**टोल फ्री** क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net